16. नैसर्गिक साधनसंपत्ती

प्रश्न 1) एका वाक्यात उत्तरे लिहा .

1. शीघ्र विद्युतवाहक कोणते आहे ?

उत्तर : तांबे हे शीघ्र विद्युतवाहक आहे .

2. दगडी कोळसा कोणते इंधन आहे ?

उत्तर : दगडी कोळसा जीवाश्म इंधन आहे .

3. उच्च प्रतीचा कोळसा कोणता आहे ?

उत्तर : अँथ्रासाइट उच्च प्रतीचा कोळसा आहे .

4. ॲल्युमिनिअमचे प्रमुख धातुक कोणते ?

उत्तर : बॉक्साइट हे ॲल्युमिनिअमचे प्रमुख धातुक आहे .

प्रश्न 2) विसंगत पद ओळखा .

1. मॅंग्नेटाइट, जेड, झिरकॉन, पाचू .

उत्तर : मॅंग्नेटाइट (इतर रत्नासम खनिजे आहेत .)

2. मॅंग्नेटाइट, हेमॅटाइट, लिमोनाइट, ग्रॅफाइट .

उत्तर : ग्रॅफाइट (इतर सर्व लोहखनिजे आहेत .)

3. अभ्रक, गंधक, जिप्सम, बॉक्साइट .

उत्तर : बॉक्साइट (इतर अधातू खनिजे आहेत .)

4. हिरा, हलाइट, माणिक, नीलमणी .

उत्तर : हलाइट (इतर रत्ने आहेत .)

5. मिथेन, इथेन, प्रोपेन, ब्यूटेन .

उत्तर : मिथेन (इतर सर्व अल्प प्रमाणात असणारे नैसर्गिक वायूचे घटक आहेत .)

प्रश्न 3) जोड्या जुळवा .

1.

‘अ’ गट	‘ब’ गट
1. थोरिअम	अ. कृत्रिम रेशीम
2. मॅग्नेशिअम	आ. कापड, कागदनिर्मिती
3. पोटॅशिअम	इ. साबण, काच, खतनिर्मिती
4. सोडिअम	ई. कॅमेऱ्याच्या फ्लॅशबल्बमध्ये
5. सल्फेट	उ. अणुऊर्जानिर्मिती

उत्तर : ‘अ’ गट	‘ब’ गट
1. थोरिअम	अणुऊर्जानिर्मिती
2. मॅग्नेशिअम	कॅमेऱ्याच्या फ्लॅशबल्बमध्ये
3. पोटॅशिअम	साबण, काच, खतनिर्मिती
4. सोडिअम	कापड, कागदनिर्मिती
5. सल्फेट	कृत्रिम रेशीम

2.

‘अ’ गट	‘ब’ गट
1. कोळंबी, पापलेट	अ. कॅन्सर रोखण्यासाठी औषध
2. सुकटीची भुकटी	आ. प्रतिजैविके
3. शिंपले	इ. प्रथिनयुक्त अन्न
4. बुरशी	ई. कोंबड्यांचे खाद्य व खत
5. शार्क, कॉड मासे	उ. औषधे व अलंकार
6. समुद्रकाकडी	ऊ. जीवनसत्त्वयुक्त तेल

उत्तर :

‘अ’ गट	‘ब’ गट
1. कोळंबी, पापलेट	प्रथिनयुक्त अन्न
2. सुकटीची भुकटी	कोंबड्यांचे खाद्य व खत
3. शिंपले	औषधे व अलंकार
4. बुरशी	प्रतिजैविके
5. शार्क, कॉड मासे	जीवनसत्त्वयुक्त तेल
6. समुद्रकाकडी	कॅन्सर रोखण्यासाठी औषध

3.

‘अ’ गट	‘ब’ गट
1. अडुळसा	अ. अर्काचा कॅन्सरवर उपचार
2. बेल	आ. मळमळीवर इलाज
3. कडुनिंब	इ. मलेरियावर औषध
4. सदाफुली	ई. ताप, सर्दी यांवर इलाज
5. दालचिनी	उ. अतिसारावर इलाज
6. सिंकोना	ऊ. खोकला, कफ दूर करण्यासाठी

उत्तर :

‘अ’ गट	‘ब’ गट
1. अडुळसा	खोकला, कफ दूर करण्यासाठी
2. बेल	अतिसारावर इलाज
3. कडुनिंब	ताप, सर्दी यांवर इलाज
4. सदाफुली	अर्काचा कॅन्सरवर उपचार
5. दालचिनी	मळमळीवर इलाज
6. सिंकोना	मलेरियावर औषध

प्रश्न 4) पुढील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा .

1. धातुकांपासून धातू मिळवण्याच्या प्रक्रियेमधील दोन महत्त्वाचे टप्पे लिहा .

उत्तर : निष्कर्षण आणि शुद्धीकरण हे धातुकांपासून धातू मिळवण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाचे दोन टप्पे आहेत .

2. पाच खनिजांची नावे व त्यांपासून मिळणारे उपयुक्त पदार्थ लिहा .

उत्तर : लोहखनिज, मँगनीजची असे अनेक खनिजे उपयुक्त आहेत .

1. लोहखनिज : लोहखनिजाचा उपयोग लोखंडाचे साहित्य तयार करण्यासाठी केला जातो . ज्या ज्या वस्तू लोंखडाने तयार केल्या जातात त्या सर्व लोहखनिजाचा वापर करुनच बनवतात. उदा . अवजारे, रेल्वे रुळ, लोंखडी कारखाने, अवजड उद्योगधंदे इत्यादी पूर्णपणे लोहखनिजावर अवलंबून असतात .

2. मँगनीज : मँगनीजची अनेक संयुगे उपयुक्त असतात . त्यांचा वापर औषधे तयार करण्यासाठी तसेच काचेला गुलाबी रंगछटा देण्यासाठी केला जातो . मँगनीजचा विद्‌यूत उपकरणांमध्येही वापर केला जाते.

3. बॉक्साइट : हे ॲल्युमिनिअमचे मुख्य धातुक आहे . याच्यापासून ॲल्युमिनिअम मिळते . उत्तम वीजवाहक व उष्णतावाहक असल्याने ॲल्युमिनिअमचा वापर विजेच्या तारा बनवण्यासाठी केला जातो . तसेच त्याची घनता कमी असल्यामुळे विमाने, वाहतुकीची साधने यांमध्ये त्याचा प्रामुख्याने उपयोग केला जातो .

4. तांबे : विजेच्या तारा तांब्यापासून बनविल्या जातात कारण तांबे हे विजेचे वहन जलदरित्या करते . रेडिओ, टेलिफोन, लहान मुलांच्या पायातील वाळे, वाहने तसेच भांडी व मूर्ती बनवण्यासाठी तांब्याचा वापर केला जातो .

5. अभ्रक : औषधे, रंग, विद्युतयंत्रे व उपकरणे, बिनतारी संदेश यंत्रणा अशा अनेक ठिकाणी अभ्रकाचा वापर केला जातो .

3. जीवाश्म इंधन म्हणजे काय ? त्यांचे प्रकार कोणते ?

उत्तर : जीवाश्म हा शब्द जीव + अश्म म्हणजेच जीवाश्म, जीव म्हणजे सजीव सृष्टी तर अश्म म्हणजे दगड होय असा त्याचा अर्थ होतो . पृथ्वीवरील लाखो वर्षांपूर्वी वनस्पती, जंगले आणि सजीवसृष्टी नैसर्गिक घडामोडींमुळे जमिनीमध्ये गाडली गेली . त्यांच्यावर मातीचे थर जमा होत गेले . तसेच या अवशेषांवर, वरुन मोठ्या प्रमाणात दाब पडला व चहूबाजूंनी पृथ्वीच्या पोटातील उष्णतेचा परिणाम झाला. जी सजीवसृष्टी गाडली गेली होती त्यांचे रुपांतर हळूहळू इंधनात होत गेले . त्याला जिवाश्म इंधन असे म्हणतात . त्या वनस्पतींच्या अवशेषांपासून दगडी कोळसा तयार झाला . तसेच इतर सर्व सजीवांपासून खनिज तेल व नैसर्गिक वायू तयार झाले .

4. खनिज तेलापासून कोणकोणते घटक पदार्थ मिळतात, त्यांची यादी करा .

उत्तर : पेट्रोलिअम हे हायड्रोकार्बन या प्रकारच्या अनेक संयुगांचे मिश्रण असते . त्यामध्ये ऑक्सिजन, नायट्रोजन आणि गंधकाची संयुगे असतात . पेट्रोल, डिझेल, केरोसीन, नॅफ्था, वंगण, डांबर हे घटक खनिज तेलापासून मिळतात.

5. नैसर्गिक वायू म्हणजे काय ? त्याचे घटक लिहा .

उत्तर : जीवाश्म इंधनाचा प्रकार म्हणजेच नैसर्गिक वायू होय . नैसर्गिक वायू म्हणून भूगर्भात पेट्रोलिअमच्या सान्निध्यात आणि इतर काही ठिकाणी केवळ याचा साठा सापडतो . नैसर्गिक वायूमध्ये मिथेन (CH_4) हा मुख्य घटक आहे . इथेन ($C_2\ H_6$) प्रोपेन ($C_3\ H_8$) ब्यूटेन ($C_4\ H_{10}$) हे इतर अल्प प्रमाणातील घटक नैसर्गिक वायूत असतात .

6. कंप्रेस्ड नॅचरल गॅसची वैशिष्टये सांगा .

उत्तर : कंप्रेस्ड नॅचरल गॅस म्हणजेच CNG त्याची वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत

1) तो सहज पेट घेतो . 2) ज्वलनानंतर घनकचरा शिल्लक राहत नाही . 3) कमी प्रमाणात CO_2 आणि पाणी तयार होते . 4) सहजतेने वाहून नेता येतो . 5) इतर प्रदुषके तयार होत नाहीत . 6) ज्वलनावर सहज रित्या नियंत्रण मिळविण्यात येते

7. वाहनांसाठी वापरल्या जाणाÚया इंधनाचा अपव्यय का टाळावा ?

उत्तर : 1) संपूर्ण जगात आणि विशेषतः भारतात लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे . 2) दळणवळण हा विकासातील महत्वाचा भाग बनला आहे . त्यामुळे त्यासाठी लागणाऱ्या वाहणांची संख्याही खूप झपाट्याने वाढत आहे . त्यामुळे इंधनांची मागणी वाढली आहे . 3) परंतू लाखो वर्षापूर्वी तयार झालेल्या जिवाश्म इंधनाचे साठे हे मर्यादीत आहेत . त्यांच्यामध्ये वाढ होत नाही, व करताही येत नाही . 4) व वाहनांमुळे खूप मोठया प्रमाणात CO_2 निर्माण होऊन प्रदूषण आणि हवामान यात बदल होतो . 5) वाहनांसाठी वापरल्या जाणाऱ्या इंधनाचा अपव्यय केला तर एक दिवस उर्जा संकट निर्माण होईल वाहने बंद पडतील दळणवळण थांबेल .

8. जंगलातून आपणांस काय काय मिळते ?

उत्तर : जंगलातील वनस्पतींकडून अनेक उत्पादने मिळतात . उदा . अर्कयुक्त तेले, विविध फळे, कंदमुळे, कात, रंग, बांधकामासाठी लाकूड, सरपण, औषधे, धागे, कागद, रबर, डिंक, सुगंधी द्रव्ये, अशी अनेक उत्पादने मिळतात . मध आणि लाख जंगलातून कीटकांच्या साहाय्याने मिळवता येते . जंगलामुळे हवामान बदल, मृदा धूप, प्रदूषण अशा घातक ठरणाऱ्या गोष्टीपासून बचाव होतो . जलसंधारण, पाण्याची पातळी वाढवणे, पावसाची नियमितता अशी अनेक संरक्षक कामे जंगला पासून मिळतात .

9. जंगलाची संरक्षक कार्ये स्पष्ट करा ?

उत्तर : जंगलाची संरक्षक कार्ये पुढील प्रमाणे –

भूपृष्ठावरुन वाहणाऱ्या पाण्याचा वेग कमी करणे . मृदा धूपेला प्रतिबंध करणे . पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत करणे . CO_2 वायू शोषून हवा शुद्ध ठेवणे व हवेतील वायूंचे संतुलन राखणे . पाण्याच्या बाष्पीभवनाचा वेग कमी करणे . वन्य जीवांना आसरा आणि अन्न देऊन संरक्षण करणे. पुरांवर नियंत्रण ठेवणे . पर्यावरणाची गुणवत्ता सुधारण्यास व टिकवण्यास जंगलांची मदत होते .

10. वनस्पती व प्राणी यांचे जंगलातील वैविध्य का कमी होत चालले आहे ?

उत्तर : मानवाच्या लोकसंख्येची वाढ मोठ्या प्रमाणात होत असल्याने जमिनीची आवश्यकता भासते . इमारती तसेच औद्योगिकरणासाठी जंगलतोड करण्यात येत आहे . आपल्याला ज्या उत्पादनाची गरज असते ती उत्पादने मिळवण्यासाठी आपण जंगलातील जैवविविधता नष्ट करतो . शिकार केल्यामुळे जंगलातील प्राण्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे . मानवाच्या या कारणामुळे वनस्पती व प्राणी यांचे जंगलातील वैविध्य कमी होत चालले आहे .

11. सागरसंपत्तीमध्ये कशाकशाचा समावेश होतो ? त्याचा आपल्याला काय उपयोग आहे ?

1. सागरसंपत्ती : सागरसंपत्तीचे दोन प्रकार पडतात . जैविक आणि अजैविक . जैविक संपत्तीत शार्क, कॉर्ड , सुरमई, पापलेट, बोंबील असे मासे व कोळंबी, शिंपले, समुद्रकाकडी यांसारखे सागरी जीव यांचा समावेश होतो तर अजैविक संपत्तीमध्ये महासागराच्या पाण्यात विरघळलेल्या स्थितीतील खनिजे पुढीलप्रमाणे असतात .

उदा. फॉस्फेट, सोडिअम, मॅग्नेशिअम, मँगनीज, गंधक, आयोडिन, यरेनिअम आणि थोरिअम इत्यादी सापडतात . युरेनिअम आणि थोरिअम अणुऊर्जानिर्मितीत वापरले जाते. अनेक प्रकारची रत्ने, शंख, शिंपले, मोती सागरातील प्राण्यांकडून मिळतात . सागरतळाशी खनिज तेलाचा व नैसर्गिक वायूचा मोठा साठा आहे. त्याचा इंधन म्हणून वापर होतो .

2. उपयोग : 1) अनेक लोकांच्या रोजच्या जेवनातील मुख्य अन्न मासा आहे 2) शंख-शिंपले यांचा औषध निर्मिती, अलंकार, शोभेच्या वस्तू तयार करण्यासाठी केला जातो . या कॅन्सर व ट्यूमर रोखण्यासाठी समुद्रकाकडी प्राण्याचा औषध म्हणून उपयोग केला जातो. कोळंबीची निर्यात केली जाते . त्यातून बरेच परकीय चलन आपल्या देशाला मिळते . 3) सागरी खनिजे विविध उद्योगांत वापरली जातात . 4) मोती -पोवळी अशा रत्नांना खूप मागणी असते . 5) समुद्राच्या पाण्यापासून आपणास चवीसाठी लागणारे मीठ तयार केले जाते. 6) खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचा इंधन म्हणून उपयोग होतो .

12. नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन व संवर्धन करण्याचे उपाय कोणते आहेत ?

उत्तर : 1) नैसर्गिक साधनसंपत्तीबद्दल सर्वांना जागरुक करणे हा एक महत्त्वाचा उपाय आहे . 2) नैसर्गिक साधनसंपत्ती संपून जाऊ शकते . त्यामुळे तिच्या वापरावर आपण नियंत्रण ठेवावे . 3) नैसर्गिक समतोल राखण्यासाठी ज्या मार्गांनी साधनसपंदा वाढेल त्याचा अवलंब करावा, उदा . वनीकरणाच्या मोहिमा हाती घेऊन जंगले वाढवणे . 4) पर्यायी ऊर्जा स्त्रोत असे पर्याय वापरले पाहिजेत. 5) प्रदूषणाला आळा घालणे. प्रदूषणाने नैसर्गिक साधनसंपदा नष्ट होते . पेट्रोल, डिझेल सारखे इंधनाचा वापर काटकसरीने करावा .

13. देशाची आर्थिक स्थिती नैसर्गिक साधनसंपत्तीवर कशी अवलंबून आहे ?

उत्तर : नैसर्गिक साधनसंपदेवर राष्ट्रीय उत्पन्न अवलंबून असते . आपल्या देशाच्या मातीतून खनिजे आणि जीवाश्म इंधने, नैसर्गिक वायू आदी मिळाले तर त्यातून आपल्या देशाला संपत्ती मिळते . अशी संपदा निर्यात झाल्यास आपल्याला अमूल्य

असे परकीय चलन मिळते. आपली निर्यात वाढली की देशाची आर्थिक स्थिती चांगली होते . उदा . सौदी अरेबिया या सारख्या देशात इंधनाच्या खाणी मोठया प्रमाणात आढळतात त्यामुळे हा देश प्रगतीपथावर आहे .

15. ONGC म्हणजे काय ?

उत्तर : तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळाची स्थापना 14 आॅगस्ट 1956 रोजी भारत सरकारच्या पेट्रोलिअम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयांतर्गत झाली यालाच ONGC असे म्हणतात . या कंपनीद्वारा तेल आणि वायू संशोधन केले जाते . ONGC चे मुख्यालय उत्तराखंड राज्यातील डेहराडून या ठिकाणी आहे . ONGC द्वारे भारतातील सुमारे 77 % कच्च्या तेलाचे आणि सुमारे 62 % नैसर्गिक वायूचे उत्पादन केले जाते . व्यावसायिकदृष्ट्या भारतामधील भूगर्भातील 7 तेलसाठयांपैकी 6 तेलसाठयांचा शोध ONGC ने यशस्वीरीत्या घेतला आहे . मुंबईच्या खोल समुद्रातील ‘सागरसम्राट’ तेलविहिरीचे कार्यदेखील ONGC पाहते.

प्रश्न 5) पुढे दिलेल्या तीन प्रकारांच्या आधारे नैसर्गिक साधनसंपत्तीचे वर्णन लिहा .

अ. खनिज संपत्ती. आ. वनसंपत्ती. इ. सागरसंपत्ती.

उत्तर :

अ) खनिज संपत्ती :

1 आपले दळणवळण, विद्युतनिर्मिती हे सारे खनिज संपत्तीवरच अवलंबून आहे .

2. काही खनिजे धातुकांच्या स्वरुपात असतात. धातुकांपासून शुद्ध करुन काढलेले धातू मानवासाठी खूपच उपयोगी असतात .

3. धातूंप्रमाणेच हिरा, माणिक, नीलमणी, पाचू, जेड, झिरका०ॅन यांसारखी रत्ने, मौल्यवान सोने, चांदी, प्लॅटिनम हे सारे खनिज संपत्तीचाच भाग आहेत .

4. भूगर्भात सैंधव मिठाचे साठेही सापडतात. लोह, मँगनीज, बा०ॅक्साइट, तांबे, अभ्रक अशा खनिजांशिवाय तर मानवी व्यवहार अशक्य आहेत .

5. जीवाश्म इंधने जसे दगडी कोळसा, खनिज तेल आणि नैसर्गिक वायू यांमुळे आपल्याला विविध प्रकारे ऊर्जा मिळते .

6. खाणकामाद्वारे पृथ्वीच्या भूगर्भातून काढण्यात येते . सोने, चांदी, तांबे, प्लॅटिनम आणि बिस्मथ यांसारखे धातू मुक्त स्थितीत भूगर्भात सापडतात .

आ) वनसंपत्ती :

1. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वनसंपत्ती अत्यंत महत्वाची आहे . दुष्काळावर मात करण्यासाठी वनांची महत्वपुर्ण भूमिका असते. पण मानवी गरजामुळे वनसंपत्तीचा दिवसेंदिवस ऱ्हास होत चालला आहे .

2. जंगलांमुळे ऑक्सिजनचे मुबलक प्रमाण राहण्यासाठी, हवामान, ऋतुचक्र सुरळीत चालण्यासाठी, पर्जन्यमान, अशांसारख्या अनेक निसर्गतः होणाऱ्या घटनांचे नियंत्रण ठेवता येते .

3. वनसंपत्तीमुळे आपल्याला विविध प्रकारचे लाकूड मिळतात . त्यामध्ये साग,चंदन देवदार, साल, शिसव, खैर, बाभूळ अशी अनेक प्रकारची लाकडे मिळतात . त्यामुळे बांधकाम, शेतीची अवजारे, फर्निचर अशा गरजा पूर्ण होतात .

4. पेपर, रबर, आयुर्वेदीक औषधे, तेले, साबण, सौंदर्यप्रसाधने अशी अनेक उत्पादने वनसंपदेमुळे आपल्याला मिळतात .

5. गवत, लाख, रंग, फळे, पाने, डींक, राळ,साली प्राणीज व खनिज पदार्थ इ. आपल्याला जंगलातून म्हणजेच वनसंपत्तीतून मिळतात .

इ) सागरसंपत्ती :

पृथ्वीवरील 70 टक्के भूभाग हा समुद्राने व्यापला आहे . भरती – ओहोटीच्या लाटापासून ऊर्जा प्राप्त करता येते . समुद्राच्या तळाशी नैसर्गिक संपत्तीचे साठे आहेत . समुद्रातून प्रथिनयुक्त सागरी अन्न मिळते . विविध प्रकारचे मासे, अन्य जीव ही आपली पोषणाची निकड भागवतात . तसेच खनिजे आणि जीवाश्म इंधने सागरतळाशी सापडतात . खनिज तेलाचा व नैसर्गिक वायूचा साठा, थोरिअम, मॅग्नेशिअम, पोटॅशिअम, सोडिअम, सल्फेट ही महत्त्वाची खनिजे सागरी जलात सापडतात . सागरी जीवांपासून काही औषधे आणि जीवनसत्त्वयुक्त तेल मिळवले जाते . समुद्राच्या पाण्याला शुद्ध करुन त्यापासून पिण्याचे पाणी तयार करता येते. खाण्याचे मीठदेखील समुद्राच्या पाण्यापासून बनवण्यात येते .

प्रश्न 6) पुढील ओघतक्ता पूर्ण करा .



उत्तर :



प्रश्न 7) जरा डोके चालवा .

1. सर्व खनिजे ही धातुके का नसतात ?

उत्तर : धातुकांपासून बरीचशी खनिजे मिळवली जात असले तरी काही खनिजे धातुकांपासून न मिळता, मुक्त स्वरुपात मिळतात . म्हणून सर्व खनिजे ही धातुके नसतात .

2. धातुखनिज व अधातुखनिज म्हणजे काय ?

उत्तर : ज्यापासून धातू मिळतात, त्यांना धातुखनिज असे म्हणतात . ज्यापासून अधातू मिळतात, त्यांना अधातुखनिज असे म्हणतात .

3. खनिज तेलाला Liquid Gold असे का म्हणतात?

उत्तर : सोने म्हणजे खूप मौल्यवान आहे. तितकेच खनिज तेलही मौल्यवान मानले जाते, कारण संपूर्ण जगाला त्याची गरज भासते . ऊर्जेचा स्रोत असल्यामुळे खनिज तेल ही महत्त्वाची साधनसंपदा ठरते . म्हणून त्याला Liquid Gold असे म्हणतात .

4. दगडी कोळसा Black Gold म्हणून का ओळखला जातो ?

उत्तर : जीवाश्म इंधन म्हणून दगडी कोळशाला खूप महत्त्व आहे . दगडी कोळसा काळया रंगाचा असतो म्हणून त्याला मौल्यवान मानले जाते आणि तो Black Gold म्हणून ओळखला जातो .

5. नैसर्गिक वायू हे पर्यावरणस्नेही इंधन कसे ?

उत्तर : CNG सारखा नैसर्गिक वायूच्या ज्वलनानंतर घनकचरा शिल्लक राहत नाही . त्याच्या ज्वलनावर सहज निचंत्रण ठेवता येते . ज्वलनापासून कमी प्रमाणात CO_2 आणि पाणी तयार होते . परंतु इतर प्रदूषके तयार होत नाहीत . वाहतूक पण सहज होऊ शकते . किंमतीने कमी असते . म्हणून त्याला पर्यावरणस्नेही इंधन असे म्हणतात .

****